**<u>प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे साक्षीदार क्र. ०१ श्री. अर्जुन ज्ञानेश्वर गवस (प्रतिवादी क्र.३)चा उलटतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस्. पी. देसाई यांचेकडून शपथेवर सुरु</u>**

२५) हे मला माहिती आहे की, मी स्वतः या दाव्याच्या कामी प्रतिवादी क्र. ३ म्हणुन स्वतंत्र माझी कैफियत दाखल केलेली आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील परीच्छेद क्र. ६ ते ९, १२ ते १९ मधील नमुद मजकुर माझ्या कैफियतीमध्ये नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला कैफियत देताना सदर परीच्छेदांबद्दल वैयक्तीक माहिती नसल्याने मी ते कैफियतीत नमुद केले नाहीत.

२६) दावा मिळकतीचे सर्व्हे वर्णन मला सांगता येईल. हे म्हणणे खरे नाही की, मी सर्व्हे क्र. ७२ हि.क्र.१ या मिळकती संदर्भात अन्य इसमांकडुन कुलअखत्यारपत्र किंवा अधिकारपत्र घेऊन वादीं विरुद्ध उपविभागीय महसुल अधिकारी व जिल्हा न्यायालय येथे प्रकरणे दाखल केली आहेत. या जमीनीवर माझा अधिकार मी खरेदीखत क्र. ४४६/२०२१ दि.२६.०७.२०२१ अन्वये सांगत आहे. प्रीती कृष्णा म्हावसकर व कलावती गजानन सावंत या दोन व्यक्तीनी माझ्या नावे ते खरेदीखत करुन दिले आहे. मी गिरोडे येथे राहतो. तसेच प्रीती म्हावसकर व कलावती सावंत या वझरे येथे राहतात. हे म्हणणे बरोबर आहे की, २४ तास मी त्या दोघींबरोबर असतो, असे काही नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, प्रीती व कलावती यांनी मला सांगितल्याप्रमाणे मी सांगत आहे की, प्रतिवादींनी वादींच्या नावे कोणतेही करारपत्र करुन दिले नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, कलावती व प्रीती चालु, फिरु

बोलू शकतात व त्या न्यायालयात देखील येऊ शकतात. हे म्हणणे खरे नाही की, त्या न्यायालयात खोटी साक्ष देऊ शकत नसल्याने मी त्यांच्या वतीने साक्ष देत आहे. मी दावा मिळकत स.क्र.७२/१ चा सातबारा उतारा खरेदीखत करतेवेळेस पाहिला होता. हे म्हणणे बरोबर आहे की, मी सांगितलेल्या खरेदीखताच्या पान क्र. ९ वर तो सातबारा जोडलेला आहे. आता मला नि.क्र.४८ वरील सदरच्या खरेदीखताचे पान क्र. ९ वरील सातबारा उतारा दाखविण्यात आला. हे म्हणणे बरोबर आहे की, त्या सातबाऱ्यावर श्री. चंद्रकांत शिरोडकर यांनी जमीन वर्ग–१ करण्याकरीता ४० पट फी सक्षम अधिकाऱ्यास दिल्याचा शेरा आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, या शेऱ्याबाबत मला खरेदीखत करताना देखील जाणीव होती.

२७) हे म्हणणे बरोबर आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादीसोबत जर करार केला असेल तर त्याबाबत सदरचे प्रतिवादी क्र. १ व २ आणि वादी हेच सांगू शकतात. दि.१२.०२.२०१५ रोजी प्रतिवादी व इतर सहभागदार यांनी २१५.४० हे.आर. क्षेत्र वादीला खरेदीखताने विक्री करण्याबाबत करार केला होता, याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा करार करण्या अगोदरपासून दावा मिळकत वादीच्या ताब्यात होती. हे म्हणणे खरे नाही की, वादीने प्रतिवादी क्र. १ व २ यांचे पुर्वाधिकारी गजानन पुनाजी सावंत यांना ते मयत होण्यापुर्वी सदर दावा मिळकतीचा संपुर्ण मोबदला दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्याची जाणीव प्रतिवादी क्र. १ व २ यांना असल्याने त्यांनी वादीच्या नावे करारपत्र केले होते. हे

म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या हिश्श्याला दावा मिळकतीत ०–२६–५७ हे. आर. लागवडी योग्य क्षेत्र व ०–०६–१५ हे.आर. क्षेत्र पो.ख. असे एकुण मिळुन ०–३२–७२ हे. आर. क्षेत्र येत होते. साक्षीदार सांगतो की, ०–५७–०९ हे. आर. क्षेत्र येत होते. हे म्हणणे खरे नाही की, ०–५७–०९ हे.आर. क्षेत्र चुकीचे असल्या कारणाने त्या विरुद्ध वादीने दुरुस्तीचा अर्ज दाखल केला होता. त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये असा अर्ज प्रलंबीत होता किंवा कसे, याची माहिती मिळविण्याचा मी प्रयत्न केला होता. त्यावेळेस असा कुठलाही अर्ज प्रलंबीत नसल्याचे मला तोंडी समजले होते. मी लेखी अर्ज देऊन चौकशी केली होती किंवा कसे, हे मला आठवत नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे मी तलाठी कार्यालय व सर्कल कार्यालय येथे चौकशी केली होती. मी तहसीलदार कार्यालयात चौकशी केली नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये तहसीलदार कार्यालयात असे प्रकरण प्रलंबीत होते किंवा कसे, हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी सातबारा उताऱ्यावर क्षेत्र दुरुस्त होऊन ०–२६–५७ हे. आर. लागवडी योग्य क्षेत्र व ०–०६–१५ हे.आर. क्षेत्र पो.ख. असे एकुण मिळुन ०–३२–७२ हे. आर. क्षेत्र असे लागले आहे. दोन दिवसापुर्वी मी सातबारा उतारा प्राप्त केला आहे. तो सातबारा उतारा मी न्यायालयात हजर करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, त्या सातबारा उताऱ्यामध्ये एकुण दुरुस्त क्षेत्र ०–३२–७२ हे. आर. असे नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की, दुरुस्तीची प्रक्रिया वादी करत असताना माझ्या नावे प्रतिवादींनी करुन दिलेले खरेदीखत चुकीचे आहे. हे म्हणणे बरोबर आहे की,

खरेदीखताबाबत माहिती मिळाल्यानंतर वादीने दि.३१.०८.२०२१ रोजीची मला नोटीस पाठविली व मी त्या नोटीसीस उत्तर देऊन वादींनी माझ्याकडे खरेदीखत रद्द करुन घेण्याची मागणी मी नाकारली. हे म्हणणे खरे नाही की, दि.२१.०९.२०२१ रोजी पासून मी दावा मिळकतीतील वादीचा कब्जा काढुन घेण्याच्या धमक्या वादीस देण्यास सुरुवात केली.

२८) हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.४८ वरील खरेदीखत करण्यापुर्वी मी स्थानीक वृत्तपत्रात नोटीस प्रसीद्ध करुन हरकती मागविल्या नव्हत्या. मी कुठल्या वृत्तपत्रात जाहीरात दिली, ते माझ्या लक्षात नाही. ते वृत्तपत्र मी या कामी हजर करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, अशी नोटीस प्रसिद्ध केल्याबाबत मी खोटे सांगत आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणे खरेदीखतातील क्षेत्र ०–५७–०९ हे.आर. आहे. माझ्या माहितीप्रमाणे आज रोजी ते क्षेत्र ११ गुंठयांनी कमी झालेले आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, असे क्षेत्र कमी झाल्याने मी प्रतिवादीं विरुद्ध कोणतीही कारवाई केली नाही तसेच ते क्षेत्र खरेदीखतामध्ये दुरुस्त करण्याकरीता कोणताही दुरुस्त लेख देखील केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुळातच माझ्यातला व प्रतिवादी क्र. १ व २ यांच्यामधला व्यवहार खोडसाळ असल्याने व वादीची फसवणुक करण्याच्या उद्देशाने केलेला असल्याने मी प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या विरुद्ध कोणतीही कारवाई केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर वादीचीच कब्जाभोग्य, कसवट, वहीवाट आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील संपुर्ण

मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.४७ वरील कुलअखत्यारपत्र खोटे आहे व नि.क्र.४८ वरील खरेदीखत खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

ठिकाणः– दोडामार्ग. (वाय. पी. बावकर)
दिनांकः– १६/०१/२०२६. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) दोडामार्ग.